# 'अजुबा'चे प्रकाशन

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

अजू देशपांडे लिखित 'अजुबा' ह्या पुस्तकाचे नुकतेच विलेपार्ले येथे प्रकाशन करण्यात आले. अभिनेते सचिन खेडेकर आणि लेखक सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. सहित प्रकाशनाच्या या पुस्तकात विविध विषयांवर उपरोधिक शैलीत भाष्य करण्यात आले आहे. साध्या भाषेत वाचकांना हसवत सामान्यांच्या अडचणींवर या पुस्तकात उत्तमप्रकारे भाष्य करण्यात आल्याची प्रतिक्रिया खेडेकर यांनी प्रकाशनावेळी व्यक्त केली. पुस्तकाला सुमेध वडावाला (रिसबूड) यांची प्रस्तावना असून अनिल दाते यांचे रेखाचित्रे आहेत. हे पुस्तक प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे आणि ई-बुक www.bookganga.com वर उपलब्ध आहे.